डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
कृषिनगर, अकोला ४४४ १०४ (महाराष्ट्र)

सूचना का अधिकार

Phone No. : 0724-2258372
E-Mail –registrar@pdkv.ac.in

**महत्वाचे**

विद्यापीठांतर्गत कार्यरत असलेले सर्व कार्यालये/ विभाग तसेच महाविद्यालये/ कृषि तंत्र विद्यालये/ कृषि विज्ञान केंद्रे यांचे कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या कार्यालयीन स्तरावरील अंतर्गत तक्रार समितीचा वार्षिक अहवाल पाठविणेबाबत...

वाचा : (१) शासन निर्णय क्रमांक : मकचौ-२०१३/प्र.क्र.६३/मकक, दि. १९ जून, २०१४
(२) शासन निर्णय क्रमांक : मकचौ-२०१४/प्र.क्र.६३/मकक, दि. ११ सप्टेंबर, २०१४
(३) शासन निर्णय क्रमांक : मकचौ-२०२५/प्र.क्र.२५/का-१५, दि. २२ ऑगस्ट, २०२५
(४) विद्यापीठ परिपत्रक क. बीएबी/म.त.नि.स./२०१७/६८४/२६५७, दि. ११ ऑक्टोबर, २०१७
(५) विद्यापीठ परिपत्रक क. बीएबी/म.त.नि.स./२०२२/७९/३२२६, दि. १५ मार्च, २०२२
(६) विद्यापीठ परिपत्रक क. बीएबी/म.त.नि.स./२०२३/१३७ , दि. ०३ मे, २०२३
(७) विद्यापीठ परिपत्रक क. बीएबी/अं.त.स./२०२६/१४५/७६, दि. ०८ एप्रिल, २०२६

## परिपत्रक

क्र. बीएबी/अं.त.स./२०२६/३७७, दिनांक :०७ सप्टेंबर, २०२६ ऑक्टोबर

कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासुन संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम - २०१३ मधील कलम ४ (१) अंतर्गत कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळाच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी विद्यापीठांतर्गत सर्व कार्यालयांमध्ये ''अंतर्गत तक्रार समिती'' गठीत करणेबाबत वाचा येथील संदर्भिय क्र. ७ वरील परिपत्रकानुसार सुचित करण्यात आलेले आहे. उपरोक्त नियमांन्वये लैंगिक छळाशी संबंधीत तक्रारीचे निवारण करण्यासाठी विद्यापीठ स्तरावर विद्यापीठ आदेश क्र. बीएबी/म.त.नि.स./२०२५/८६, दि. २८ फेब्रुवारी, २०२५ अन्वये महिला तक्रार निवारण समितीचे पुनर्गठन करण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने विद्यापीठातील सर्व नियंत्रण अधिकारी/ कार्यालय प्रमुख/ विभाग प्रमुख तसेच सर्व महाविद्यालये/ कृषि तंत्र विद्यालये/ कृषि विज्ञान केंद्रे यांना पुनःश्च सुचीत करण्यात येते की, कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासुन संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम २०१३ च्या अधिनियमातील तरतुदीनुसार ज्या आस्थापनेमध्ये १० किंवा १० पेक्षा अधिक अधिकारी/ कर्मचारी यांचा समावेश असेल अशा प्रत्येक कार्यालय प्रमुखाने आपल्या आस्थापनेमध्ये या अधिनियमातील तरतुदीनुसारच अंतर्गत तक्रार समितीचे गठण करावे. तसेच ज्या कार्यालयाने आपल्या स्तरावर सदर समितीचे गठन केले नाही त्यांनी त्वरीत समितीचे गठन करुन त्याबाबत या कार्यालयास परिपत्रक प्राप्त होताच **०७ दिवसांचे आत** अवगत करावे.

त्याचप्रमाणे कार्यालय प्रमुखांनी गठीत केलेल्या अंतर्गत तक्रार समितीकडे प्राप्त होणा-या महिलांच्या तक्रारींबाबत उपरोक्त नमुद अधिनियम - २०१३ मधील तरतुदींनुसार समितीने चौकशी करावी व कार्यालय प्रमुखांना चौकशी अहवाल सादर करावा. संबंधीत कार्यालय प्रमुखांनी प्राप्त चौकशी अहवालावर नियमानुसार योग्य ती कार्यवाही त्वरेने करावी . तसेच संदर्भिय शासन निर्णयातील तरतुदींनुसार ज्या कार्यालयामध्ये १० पेक्षा कमी अधिकारी/ कर्मचारी असतील किंवा जेथे विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांचे विरुध्द तक्रार असेल अशा तक्रारी विद्यापीठ महिला तक्रार निवारण समितीकडे करण्यात याव्यात. आपले कार्यालयीन स्तरावरील समिती गठणाचा आदेश कार्यालयाच्या दर्शनी भागावर लावण्यात यावा. तसेच सदर परिपत्रक कार्यालयात कार्यरत असलेल्या सर्व महिला अधिकारी व कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देण्यात यावे.

उपरोक्त संदर्भिय क्र. ४ ते ६ वरील विद्यापीठ परिपत्रके निरस्त करण्यात येत असुन, कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासुन संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम - २०१३ ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी उपरोक्त नमुद सुचनांचे काटेकोर पालन करण्यात यावे. या अधिनियमामधील कलम-४(१), कलम-१९ व या अधिनियमाने घालुन दिलेली इतर कर्तव्य पार पाडण्याची जबाबदारी ही प्रत्येक कार्यालय प्रमुखांची राहील अन्यथा ते या अधिनियमानुसार शिक्षेस पात्र राहतील.

(..२..)

त्याचप्रमाणे सुचित करण्यात येते की, अंतर्गत तक्रार समितीने आपला संबंधीत कॅलेंडर वर्षातील (माहे जानेवारी ते डिसेंबर) वार्षिक अहवाल कार्यालय प्रमुखांना सादर करावा. कार्यालय प्रमुखांनी आपले स्तरावरील अंतर्गत तक्रार समितीचा वार्षिक अहवाल शासन पत्राद्वारे विहित **सहपत्रित विवरणपत्र- १ व २** मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा. तसेच या कार्यालयास सुध्दा दरवर्षी १० जानेवारी पर्यंत न चुकता पाठविण्यात यावा. जेणे करून सदर अहवाल एकत्रितपणे शासनास व जिल्हाधिकारी कार्यालयास विद्यापीठ स्तरावरुन पाठविणे सोईचे होईल.

मा: कुलगुरू महोदय यांचे मान्यतेने

सहपत्र : विवरणपत्र १ व २

(प्रिती वि. रोडगे)
कुलसचिव
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

प्रतिलिपी माहिती व पुढील कार्यवाहीकरीता अग्रेषित :

१. सर्व संचालक (शिक्षण / संशोधन/ विस्तार शिक्षण), डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला
२. सर्व अधिष्ठाता (कृषि / कृषि अभियांत्रिकी / उद्यानविद्या), डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला
३. सर्व सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, अकोला/ नागपूर/ गडचिरोली/ मुल, चंद्रपूर/ उद्यानविद्या महाविद्यालय, अकोला/ वनविद्या महाविद्यालय, अकोला/ कृषि अभि. महाविद्यालय, अकोला/ पदव्युत्तर शिक्षण संस्था, अकोला/ निम्न कृषि शिक्षण, अकोला/ व.ना.कृ.जै.तं.म.,यवतमाळ/ अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ.
४. सर्व विभाग प्रमुख, कृषिविद्या/ कृषि वनस्पतीशास्त्र/ कृषि वनस्पती रोगशास्त्र/मृद विज्ञान व कृषि रसायनशास्त्र/ किटकशास्त्र/ उद्यानविद्या/ वनविद्या/ पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र/ विस्तार शिक्षण/ कृषि अर्थशास्त्र व सांख्यिकी विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
५. सर्व विभाग प्रमुख, कृषि अभियांत्रिकी/ मृद व जलसंधारण/ कृषि शक्ती व औजारे/ कृषि प्रक्रिया/ कृषि स्थापत्य/ सिंचन व निचरा/ अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत आणि विद्युत अभियांत्रिकी, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला
६. सर्व वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ, कापूस/ ज्वारी/ तेलबिया/ ऊस/ कडधान्य/ गहू संशोधन केंद्र, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला
७. सहयोगी संशोधन संचालक, संशोधन संचालनालय, अकोला/ विभागीय कृषि संशोधन केंद्र, यवतमाळ/ सिंदेवाही
८. प्रमुख शास्त्रज्ञ, अ.भा.स.सं.प्र.,(कोडरवाहू शेती)/ संशोधन अभियंता, अ.भा.स.सं.प्र.,(कापणी पश्चात तंत्रज्ञान)/ वरिष्ठ उद्यानविद्यावेत्ता, अ.भा.स.सं.प्र.,(लिंबूवर्गीय फळे ), डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला
९. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र / कृषि पध्दती व पर्यावरण केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
१०. विद्यापीठ ग्रंथपाल/ नियंत्रक/ विद्यापीठ अभियंता/ विद्यार्थी कल्याण अधिकारी, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
११. उपसंचालक संशोधन (बियाणे)/ बियाणे संशोधन अधिकारी, बियाणे तंत्रज्ञान संशोधन विभाग, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला
१२. मुख्य बिजोत्पादण अधिकारी, मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणीरंभापूर
१३. मुख्य कृषि विद्यावेत्ता, एकात्मिक शेती संशोधन प्रकल्प/ क्षेत्र अधिकारी, कृषि मुल्य योजना, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला
१४. पैदासकार तथा उद्यानविद्यावेत्ता, मिरची व भाजीपाला संशोधन विभाग, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला
१५. माहिती अधिकारी, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
१६. प्रमुख, प्रादेशिक संशोधन केंद्र, अमरावती/ उद्यानविद्यावेत्ता, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, काटोल
१७. प्राध्यापक तथा प्रमुख, कृषिविद्या शाखा/ पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र शाखा/ उद्यानविद्या शाखा, कृषि महाविद्यालय, नागपूर
१८. प्रभारी अधिकारी, नागार्जून वनऔषधी केंद्र/ मत्सशास्त्र संशोधन केंद्र/ माळी प्रशिक्षण, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

१९. सर्व प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र, अचलपूर/ यवतमाळ/ वाशिम/ बुलढाणा/ एकार्जूना/ कुटकी/ सिंदेवाही/ सोनापूर/ थारसा/ साकोली/ नवेगांवबांध/ पानवेली संशोधन केंद्र, दिवठाणा/ रामटेक/ कडधान्य व गळीत धान्य संशोधन केंद्र, आमगांव म्हाली/ जवस पैदासकार तथा प्रभारी अधिकारी, जवस संशोधन केंद्र, नागपूर/ महाराजबाग, प्राणी संग्रहालय, नागपूर/ वनशेती संशोधन प्रकल्प, नागपूर

२०. सर्व प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय, निंबी-मालोकार/ बुलढाणा/ धारणी/ वरुड/ सावंगी/ सेलसुरा/ हिवरा/ मुल-मारोडा

२१. सर्व उपकुलसचिव (आस्थापना/ साप्रवि/ विद्याविषयक)/ सर्व सहायक कुलसचिव

२२. अधिदान व लेखाधिकारी, अकोला/ नागपूर

२३. सर्व कृषि विज्ञान केंद्र ........................................................., डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

२४. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष (ARIS), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक व सहपत्रित दस्तऐवज विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

२५. कुलगुरु यांचे स्वीय सहायक यांना मा. कुलगुरु महोदय यांचे माहितीकरीता सादर.

( प्रिती वि. रोडगे)
कुलसचिव
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

## विवरण पत्र - १

शासकीय कार्यालये/ निमशासकीय कार्यालये/ शासकीय महामंडळे/ कंपन्या/ स्थानिक स्वराज्य संस्था/ शासन अनुदानीत मंडळे व संस्था इ. ठिकाणच्या महिला तक्रार निवारण समित्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारी.

**कार्यालयाचे नाव :**
**अहवालाचे वर्ष :**

| अ. क्र. | प्राप्त झालेल्या तक्रारींची संख्या | चौकशी पुर्ण करण्यात आलेली प्रकरणे | चौकशीची कार्यवाही सुरु असल्यास चौकशीची सद्य:स्थिती | थकीत प्रकरणांचे पृथ:करण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ० ते ६ महिन्यातील प्रकरणे | ७ ते १२ महिन्यातील प्रकरणे | १ वर्षावरील प्रकरणे | एकूण थकीत प्रकरणे (५+६+७) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

कार्यालय प्रमुखाचे नांव ....................................
सही..................................

## विवरण पत्र - २

शासकीय कार्यालये/ निमशासकीय **कार्यालये/ शासकीय** महामंडळे/ कंपन्या/ स्थानिक स्वराज्य संस्था/ शासन अनुदानीत मंडळे व **संस्था इ. ठिकाणच्या महिला तक्रार** निवारण समित्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारी.

**कार्यालयाचे नाव :**
**अहवालाचे वर्ष :**

---

## महिला तक्रार निवारण समिती

अध्यक्षांचे नाव :-
सदस्याचे नाव:-
सदस्याचे नाव:-
सदस्याचे नाव:-
सदस्याचे नाव:-
सदस्याचे नाव:-
सदस्याचे नाव:-
NGO सदस्याचे नाव:-
सदस्य सचिवाचे नाव :-

...................... ...................... ......................

| अ. क्र. | कार्यालयाचे नाव | महिला तक्रार निवारण समितीकडे प्राप्त झालेल्या तक्रारींची संख्या | निकालात काढलेल्या तक्रारींची संख्या | प्रलंबित असलेल्या तक्रारींची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | | |
| | | | | | |

कार्यालय प्रमुखाचे नांव ....................................
सही..................................

new.docx